| MHNB090004042022 | | |
|---|---|---|
| | दाखल दिनांक : | २२.०६.२०२२ |
| | नोंदणी दिनांक : | २२.०६.२०२२ |
| | निकाल दिनांक : | ०३.०७.२०२६ |
| | कालावधी : | ०४व. ००म. ११ दि. |

भाग–'अ'

**Form NO. XXXII**
**(Title Page of the Judgment)**
**(Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual)**

## न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, तळोदा, ता. तळोदा , जि. नंदुरबार यांचे न्यायालयात.

**(पिठासीन अधिकारी – डी.डी.माने यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला.क्र. १९/२०२२** **नि.क्र.–४३**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन तळोदा, ता तळोदा, जिल्हा नंदुरबार . |
| **– विरुध्द –** | |
| **आरोपी** | **शंकर धर्मा तडवी,**<br>वय — ३१ वर्ष, धंदा– मजूरी,<br>रा. न्युबन पुर्नवसन, ता तळोदा, जि. नंदुरबार.<br>ह. मु. छोटा धनपुर, ता. तळोदा, जि. नंदुरबार. |
| **– विधिज्ञ –** | |
| सरकारतर्फे | सहा. सरकारी विधिज्ञ — श्री. डी. आर. जयकर. |
| आरोपीतर्फे | विधिज्ञ — श्री. एम. बी. पवार. |
| **दोषारोप –** | भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे. |

भाग–'ब'

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

| | | |
|---|---|---|
| ०१ | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०६.०३.२०२२ |
| ०२ | प्रथम खबर अहवाल | ०७.०३.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| ०३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २२.०६.२०२२ |
| ०४ | दोषारोप निश्चिती दिनांक | १०.०५.२०२३ |
| ०५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८.०२.२०२५ |
| ०६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | ---- |
| ०७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०३.०७.२०२६ |
| ०८ | निकाल सुनावणीचा दिनांक | ०३.०७.२०२६ |

**आरोपींचा तपशील**

| श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ.प्र. सं. कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगामध्ये राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शंकर धर्मा तडवी** | दि. १३.०३.२०२२ रोजी सी. आर. पी. सी. ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस दोन्ही आरोपीतांना अदा केली आहे. | -- | भां.दं.वि चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे. | निर्दोष | निर्दोष | .... |

**भाग-'क'**

**(Para 44(ii) of Chapter VI of Criminal Manual)**

**LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES**

**अ- अभियोग पक्ष-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशानी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | भाईदास पोपटा पावरा | १३ | पंच साक्षीदार |
| २ | विजय जोह-या वसावे | १७ | पंच साक्षीदार |
| ३ | बोट्या धमन्या पावरा | २२ | फिर्यादी |
| ४ | व्हीला बोट्या पावरा | २७ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| ५ | रमेश जंगल्या पावरा | २८ | साक्षीदार |
| ६ | धमन्या ओजा-या पावरा | २९ | साक्षीदार |
| ७ | विरसिंग मेहरसिंग पावरा | ३० | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | डॉ. गणेश बाजीराव पवार | ३१ | वैद्यकिय अधिकारी |
| ९ | पोना. विजय गोपाल विसावे | ३४ | तपासी अधिकारी. |

**ब– बचावपक्ष साक्षीदार जर असतील तर –**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशानी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | –– | निरंक |

**क– न्यायालयीन साक्षीदार असतील तर–**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशानी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | –– | निरंक |

**ड– अभियोग पक्ष –**

| **अ.क्र.** | **कागदपत्रे** | **निशानी क्रमांक** | **दस्तऐवजास निशाणी देण्यात आलेल्या साक्षीदाराचा क्रमांक** |
|---|---|---|---|
| १. | फिर्याद | २३ | साक्षीदार क्र.३ |
| २. | छापिल प्रथम खबरी अहवाल | २४ | साक्षीदार क्र.३ |
| ३ | वैद्यकिय प्रमाणपत्र | ३२ | साक्षीदार क्र. ८ |
| ४ | घटनास्थळ पंचनामा | ३५ | साक्षीदार क्र. ९ |
| ५ | जप्ती पंचनामे | ३६ व ३७ | साक्षीदार क्र. ९ |
| ६ | ग्रामीण रूग्णालय, तळोदा यांना पत्र | ३८ | साक्षीदार क्र. ९ |
| ७ | मुद्देमाल पावती | ३९ | साक्षीदार क्र. ९ |
| ८ | आरोपीला नोटीस | ४० | साक्षीदार क्र.९ |

**ई –भौतिक वस्तु –**

| अ.क्र. | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| ०१. | पी. आर. नंबर १०/२०२२ मधील एक लाकडी काठी आणि एक फिकट आकाशी रंगाचा शर्ट | आवाहन कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत. |

## न्यायनिर्णय

( दिनाक ०३ जुलै, २०२६ रोजी जाहीर केला )

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान (यानंतर थोडक्यात ''भा.दं.वि'' असे संबोधण्यात येईल) चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे न्यायचौकशी करण्यात आली.

**०२. अभियोग पक्षाच्या खटल्याची हकिकत थोडक्यात खालील प्रमाणे –**

फिर्यादी बोट्या धमण्या यांनी फिर्याद दिली की, दि. ०६.०३.२०२२ रोजी सायंकाळी ०७.३० वाजता फिर्यादीचे वडील धमन्या याने घरा शेजारी राहणा–या शंकर धर्मा तडवी यास सांगितले कि, ''तुमचा खत अंगणात पसरत आहे ते गोळा करून घ्या, नाहीतर आमचे गुरे ढोरे ते खत खावुन घेतील''. त्यामुळे शंकर याने धमन्या याला शिवीगाळ केली. त्यानंतर शंकर नातेवाईकासह आला. त्यावेळी फिर्यादी घराबाहेर उभा होता. शंकर याने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीच्या डाव्या कानाजवळ मारले. त्यामुळे फिर्यादीच्या कानातून रक्त निघू लागले. फिर्यादीने शंकर याला विचारपूस केली. परंतु, त्याने काही सांगितले नाही. शंकर याने फिर्यादीस पुन्हा हाताबुक्कयांनी मारहाण करून जिवेठार मारण्याची धमकि दिली. फिर्यादीची पत्नी व्हीला हिने आरडाओरड केल्यामुळे फिर्यादीचे वडील धमन्या व आई भोजीबाई घराबाहेर आली. त्यांनी भांडणाची सोडवा सोडव केली. फिर्यादीला मार लागल्यामुळे त्रास होत होता. म्हणून फिर्यादीचे वडील, चुलत भाऊ रमेश, आत्याचा मुलगा विरसिंग यांनी फिर्यादीस उपजिल्हा रूग्णालय तळोदा येथे औषधोपचाराकरीता दाखल केले. अशा आशयाची तक्रार फिर्यादीने पोलीस स्टेशन, तळोदा येथे दिली.

**०३.** फिर्यादीच्या तक्रारीनुसार आरोपीविरुध्द गुन्हा क्र.५२/२०२२ कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ भां.दं.वि प्रमाणे नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना विजय गोपाल विसावे यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी आरोपीला नोटीस देऊन सोडले, मुद्देमाल जप्त केला, वैदयकिय प्रमाणपत्र हस्तगत केले, घटनास्थळ व जप्ती

पंचनामा केला व आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र. ९ प्रमाणे भां.द.वि चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणेच्या अपराधाबद्दल दोषारोप ठेवले. आरोपीने दोषारोप फेटाळुन संपरीक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शवीली. तसेच आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१)(ब) चे निवदेन निशाणी क्र.४१ वर नोंदविण्यात आले आहे. त्यामध्ये त्याने त्याच्याविरूध्द खोटी केस केल्याचे नमूद केले आहे.

**०५.** सरकारी वकील व आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**०६.** अभियोग पक्षाचा पुरावा व अभिलेख पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात ज्याचे निम्नलिखीत कारणमिमांसेवर आधारित निष्कर्ष अभिलिखीत करण्यात आलेले आहेतः

| **अं.क्र.** | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.०६.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० वा. च्या सुमारास मौजे न्युबन पुर्नवसन गावात, फिर्यादीच्या घरासमोर, ता. तळोदा येथे आरोपीने लाकडी काठी यासारख्या प्राणघातक हत्याराने फिर्यादी बोट्या धमन्या पावरा याला डाव्या कानावर मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली व त्याअनुषंगाने त्याने भारतीय दंड विधानचे कलम ३२४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही** |
| ०२. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादी याला मारहाण | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | करुन दुखापत केली व त्याअनुषंगाने त्याने भारतीय दंड विधानचे कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| ०३. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला व त्याच्या वडीलांना शिवीगाळ करुन त्यांनी सार्वजनिक शांततेचा भंग करावा किंवा एखादा अपराध करावा या उद्देशाने अपमानित केले व त्याअनुषंगाने त्याने भारतीय दंड विधानचे कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही** |
| ०४. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्याअनुषंगाने त्याने भारतीय दंड विधानचे कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला ? | **नाही** |
| ०५. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुददे क्र. १ ते ४ बाबत –**

**०७.** सोईच्या दृष्टीने मी हे सर्व मुददे विवेचनासाठी सोबत घेतले आहेत. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी नऊ साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोगपक्षाने महत्तवाचे साक्षीदार तपासल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंती वरून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**०८.** भाईदास पोपटा पावरा (सा.क्र.१) आणि विजय जोह–या वसावे (सा.क्र.२) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे पंच साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, त्यांना पोलीसांनी दि. ०८.०३.२०२२ रोजी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले होते किंवा नाही हे त्यांना आठवत नाही. पंचनामा

कशाबाबत होता हे त्यांना आठवत नाही. त्यांनी फक्त त्यांच्या सहया ओळखल्या. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्या कारणाने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सुचक प्रश्न कोर्टाच्या पुर्वपरवानगीने विचारले. परंतु अभियोग पक्षास कसल्याही प्रकारचे फलित प्राप्त झाले नाही. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नास सदर साक्षीदारांनी नकारार्थी उत्तर नोंदविले आहे. सदर साक्षीदाराच्या संपुर्ण साक्षीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाच्या उपयोगाची नाही.

०९. बोट्या धमन्या पावरा (सा.क्र. ३) हे फिर्यादी आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, ते न्युबन येथे राहतात. ते, त्यांचे आई वडील, पत्नी व मुलगा यांच्यासह राहतात. घटना हि दि. ०६.०३.२०२२ रोजी त्यांच्या राहत्या घरी संध्याकाळी ०७.३० वाजता घडली. त्यावेळी त्यांच्या वडीलांनी आरोपी शंकर याला त्याचा खत गोळा करून ठेव असे सांगितले होते. त्यावेळी शंकर याला त्यांचे वडीलांचा राग आल्याने त्याने त्यांच्या वडीलांना शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी शंकर हा त्याच्या नातेवाईकांना घेवून आला. त्याने काठीने त्यांच्या उजव्या कानावर मारल्याने त्यांच्या कानातून रक्त निघत होते. त्यावेळी त्यांची पत्नी व्हीला हिने आरडाओरड केल्याने त्यांचे आई व वडील आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर त्यांचे वडील व भाऊ यांनी त्यांना तळोदा येथील सरकारी दवाखान्यात आणले आणि त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशन तळोदा येथे आरोपीविरूध्द फिर्याद नि.क्र. २३ आणि छापिल प्रथम खबरी अहवाल नि.क्र. २४ दिली. त्यांना ज्या काठीने मारहाण झाली होती. ते ती ओळखतात. त्यांनी पी. आर. नंबर १०/२०२२ मधील काठी आर्टिकल अ आणि आर्टिकल ब मधील शर्ट त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले.

१०. व्हीला बोट्या पावरा (सा.क्र.४) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, दि.

०६.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास ते व त्यांचे पती त्यांच्या घरी हजर होते. सदर दिवशी शंकर धर्मा पाडवी याने त्यांच्या अंगणामध्ये खत ठेवले होते त्यावेळी त्यांचे सासरे धमन्या पावरा यांनी आरोपीला ''खत तुमच्या अंगणामध्ये ठेवा, आमचे जनावरे तुमच खत खाऊन टाकतील'' असे सांगितले. त्यानंतर आरोपी शंकर हा घरी गेला व तो माणसे घेऊन आला. त्यानंतर शंकर याने बोट्याला लाकडी काठीने डाव्या कानाजवळ मारले. त्यामुळे बोट्याला रक्त निघणारी जखम झाली. विरसिंग याने भांडण सोडविले. त्यानंतर ते बोट्याला दवाखान्यात घेऊन गेले. तेथे त्यांच्यावर उपचार केल्यानंतर ते घरी निघून गेले. ज्या काठीने बोट्याला मारहाण झाली होती ती पी. आर. नंबर १०/२०२२ मधील लाकडी काठी आर्टिकल अ व शर्ट आर्टिकल ब त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला.

**११.** रमेश जंगल्या पावरा (सा.क्र.५) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, दि. ०६.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ०८.०० वाजताच्या सुमारास ते त्यांच्या घरी गौंडाळे येथे होते. त्यावेळी त्यांचे काका धमन्या पावरा यांचा त्यांना फोन आला व त्यांनी सांगितले कि, बोट्याला शंकर तडवी याने मारले आहे. त्यानंतर ते त्यांची चार चाकीगाडी घेऊन बोट्याच्या घरी गेले. त्याला सदर गाडीत बसवून तळोदा येथे दवाखान्यात आणले आणि बोट्याला कानावरती मार लागून रक्त निघत होते. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता.

**१२.** धमन्या ओजा–या पावरा (सा.क्र.६) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, घटना हि तीन वर्षापूर्वी संध्याकाळी ०७.०० वाजताच्या सुमारास न्युबन पुर्नवसन येथे घडली होती. सदर दिवशी त्यांच्या घराच्या बाजूला चारा ठेवला होता तसेच, आरोपी शंकर तडवी याने त्याचे खत ठेवले होते. त्यांचा मुलगा बोट्या धमन्या याने खत जनावरे खातील म्हणून

बाजूला काढून ठेवले होते. त्यावेळी आरोपीने डेंगा–याने त्यांचा मुलाच्या डाव्या कानावरती मारले. ते घरातून बाहेर आले त्यावेळी दोघांची भांडण चालू होती. त्यांच्या मुलाच्या कानातून रक्त येत होते. त्यांनी दोघांची भांडण सोडविली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या मुलाला सरकारी दवाखाना, तळोदा येथे उपचाराकरीता दाखल केले. त्यानंतर त्यांनी तळोदा पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. पी. आर. नंबर १०/२०२२ मधील काठी आर्टिकल अ ने त्यांच्या मुलाला मारहाण झाली होती तसेच, आर्टिकल ब मधील शर्ट हे त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखले.

**१३.** विरसिंग मेहरसिंग पावरा (सा.क्र. ७) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, घटना हि दि. ०६.०३.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास बोट्या धमन्या याच्या घरी घडली होती. सदर दिवशी व्हीला बोटया हिचा आवाज आल्यामुळे ते त्यांच्या घरी गेले. तेथे त्यांनी पाहिले कि, शंकर व बोट्या यांच्यामध्ये भांडण चालू होते. सदर भांडण त्यांनी सोडविले. तेथे त्यांनी शंकर धर्मा याच्या हातामध्ये काठी पाहिली होती. बोट्या याच्या डाव्या कानाजवळून रक्त निघत होते. त्यांनी भांडण सोडविले व धमन्या यास घटनेबाबत माहिती विचारली होती. त्यावेळेस त्यांनी सांगितले कि, त्यांनी शकर याला त्यांच्या घराजवळील खत काढून घ्या अन्यथा, जनावरे खातील असे सांगितले असता शंकर याने त्यांना धमकि देण्यास सुरूवात केली. त्यानंतर तो घरात निघून गेला, त्यानंतर शंकर याने माणसे आणली व त्यांचा मुलगा बोट्या यास काठीने मारहाण केली. त्यानंतर तो बोट्या याला सरकारी दवाखाना तळोदा येथे दाखल केले. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. बोट्याने घटनेच्या वेळी शर्ट पॅन्ट घातले होते. त्यांनी पी. आर. नंबर १०/२०२२ मधील काठी आर्टिकल अ ने बोट्याला मारहाण झाली होती व शर्ट आर्टिकल ब न्यायालयासमक्ष ओळखले.

**१४.** डॉ. गणेश बाजीराव पवार (सा.क्र.८) हे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे वैदयकिय अधिकारी आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, त्यांचे शिक्षण एम बी बी एस पर्यंत झाले आहे. ते सन १९९८ पासून वैदयकिय व्यवसाय करत आहेत. दि. ०७.०३.२०२२ रोजी ते ग्रामीण रूग्णालय तळोदा येथे वैदयकिय अधिकारी म्हणून कार्यरत होते. सदर दिवशी पोलिसांनी त्यांच्याकडे बोट्या धमन्या पावरा, वय ४६ वर्षे यास पाठविले होते. त्यांनी त्याला ०१.०० वाजता तपासले आणि त्याला डाव्या गालावर १ x १/२ x १/२ सेंटिमीटर इतकी जखम होती. जखम हि चोवीस तासांच्या आतील असून जखम हि कठिण व बोथट हत्या–याने झालेली होती. जखम हि साध्या स्वरूपाची होती. त्यांनी वैदयकिय प्रमाणपत्र नि.क्र.३२ तयार केले. त्यांनी सांगितले कि, पी. आर. नं. १०/२०२२ मधील आर्टिकल अ काठी हे कठिण व बोथट हत्यार आहे व त्याने सदर जखम होऊ शकते.

**१५.** पोना. विजय गोपाल विसावे (सा.क्र. ९) हे तपासी अधिकारी आहेत. त्यांनी त्यांचे साक्षी मध्ये कथन केले की, सन २०२२ मध्ये ते तळोदा पोलिस स्टेशन येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होते. गुन्हा क्र. ५२/२०२२ चा तपास हा त्यांच्याकडे देण्यात आला होता. सदर तपास हा भा. द. वि. कलम ३२४, ५०४, ५०६ अन्वये होता. तपासकामी त्यांना फिर्याद आणि छापिल प्रथम खबरी अहवाल मिळाला होता. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ३५ केला. त्यानंतर त्यांनी जप्ती पंचनामे नि.क्र. ३६ व ३७ केले. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांनी फिर्यादीचे वैदयकिय प्रमाणपत्र मिळण्याकरीता ग्रामीण रूग्णालय, तळोदा यांना पत्र नि.क्र. ३८ दिले. सदर पत्राच्या अनुषंगाने ग्रामीण रूग्णालय तळोदा यांनी त्यांना वैदयकिय प्रमाणपत्र नि.क्र. ३२ दिले. त्यांनी मुद्देमाल पावती नि.क्र. ३९ तयार केली. त्यांनी आरोपीला नोटीस नि.क्र. ४० देऊन सोडून दिले. त्यांनी पी. आर. नं. १०/२०२२ मधील काठी व शर्ट आर्टिकल अ व ब

न्यायालयासमक्ष ओळखले. आरोपीविरूध्द सबळ पुरावा आढळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**१६.** प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने एकूण नऊ साक्षीदार तपासलेले आहेत. त्यापैकि, साक्षीदार क्र. १ भाईदास पावरा, साक्षीदार क्र. २ विजय वसावे यांनी अभियोगपक्षास समर्थन दर्शविले नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण हे साक्षीदार क्र. ३ ते ९ यांच्या साक्षीवरती अवलंबुन आहे. त्यामुळे उपलब्ध साक्षीदारांची साक्ष आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप शाबीत करण्याकरीता किती विश्वासपुर्ण आहेत हे पाहणे गरजेचे आहे.

**१७.** प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र.३ बोट्या हा फिर्यादी आहे. त्याने फिर्याद नि.क्र. २३ मध्ये असे नमूद केले आहे कि, आरोपी शंकर याने लाकडी काठीने त्याच्या डाव्या कानाजवळ मारले. तसेच, अभियोगपक्षाच्या इतर साक्षीदारांनी देखील काठी डाव्या कानाजवळ मारल्याचे कथन केले आहे. वैदयकिय प्रमाणपत्र नि.क्र. ३२ प्रमाणे देखील जखम उजव्या गालावर झाल्याचे नमूद आहे. परंतु, फिर्यादीने सरतपासामध्ये काठी त्याच्या उजव्या कानावर मारल्याचे कथन केले आहे. यावरून असे दिसून येते कि, फिर्यादी हा त्याने दाखल केलेल्या फिर्यादीच्या विसंगत कथन करत आहे.

**१८.** फिर्यादीने त्याच्या सरतपासामध्ये आरोपीने जिवे मारण्याची धमकि दिल्याबाबत तसेच, हाताबुक्क्यांनी त्याला मारहाण केल्याबाबत सांगितले नाही. फिर्यादीने फिर्यादी मधील महत्त्वाच्या बाबी सरतपासामध्ये सांगितल्या नाहीत.

**१९.** फिर्यादीने सरतपासात घटना त्याच्या राहत्या घरी घडल्याचे कथन केले आहे. फिर्यादीचे वडील धमन्या ( सा.क्र. ०६) यांनी उलटतपासात असे कथन केले आहे कि, त्यांचे गावात दोन घरे असून एक घर पक्के तर एक घर कच्चे बांधकाम केलेले आहे. सदर घरा पैकी कच्च्या घरात बोट्या राहत असून पक्क्या घरात धमन्या हे राहतात. परंतु, पंचनामा नि.क्र. ३५ प्रमाणे घटना पक्क्या घराजवळ घडली होती.

यावरून असे दिसून येते कि, घटनास्थळाबाबत फिर्यादी घटनास्थळ पंचनामा नि.क्र. ३५ च्या विसंगत अशी साक्ष देत आहे.

२०. फिर्यादीने सरतपासामध्ये आरोपी शंकर हा नातेवाईकांना घेऊन आला असे नमूद केले आहे. परंतु, उलटतपासात त्याने हे मान्य केले आहे कि, त्याला सदर नातेवाईकांचे नावे सांगता येणार नाहीत. तसेच, अभियोगपक्षाच्या इतर साक्षीदारांनी देखील आरोपी सोबत माणसे आल्याचे कथन केले आहे. परंतु, कोणीही आरोपी सोबत आलेल्या इतर व्यक्तींची नावे व त्यांनी घटनास्थळी काय केले याबाबत काहीही नमूद केले नाही. तसेच, तपासी अधिकारी यांनी देखील त्यांच्या तपासामध्ये तेथे आरोपी सोबत आलेल्या माणसांची नावे नमूद केली नाहीत.

२१. अभियोगपक्षाचा साक्षीदार क्र. ६ धमन्या हे फिर्यादीचे वडील आहेत. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे सदर साक्षीदाराने आरोपीस खत गोळा करून ठेव असे सांगितल्यामुळे आरोपीने त्यास शिवीगाळ केली व त्यानंतर आरोपी नातेवाईकास घेऊन आला व आरोपीने सदर साक्षीदाराच्या मुलास काठीने कानाजवळ मारले. परंतु, सदर साक्षीदाराने त्याच्या सरतपासात असे कथन केले आहे कि, आरोपीचा खत त्याचा मुलगा फिर्यादी बोट्या याने बाजूला काढून ठेवला असता आरोपीने लाकडी काठीने त्याच्या मुलाच्या डाव्या कानावरती मारले. सदर साक्षीदाराच्या साक्षीवरून असे दिसून येते कि, साक्षीदार फिर्यादीच्या विसंगत अशी साक्ष देत आहे.

२२. सदर साक्षीदाराने आरोपी याने त्यास शिवीगाळ केल्याचे तसेच, फिर्यादीस जिवे मारल्याची धमकि दिल्याचे व हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचे सरतपासात कथन केले नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षाच्या कथनाशी विसंगत अशी साक्ष नोंदविली असून मोघम स्वरूपाची साक्ष दिली आहे.

२३. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे फिर्यादीची पत्नी व्हीला हिने आरडाओरड केल्यामुळे फिर्यादीचे वडील धमन्या व आई भोजीबाई हे घराबाहेर आले होते. परंतु, धमन्या (सा.क्र.६) याने त्याबाबत त्याच्या सरतपासात काहीही नमूद केले नाही.

२४. फिर्यादी याने असे कथन केले आहे कि, त्याचे वडील धमन्या यांनी आरोपीस खत गोळा करण्यास सांगितले होते. परंतु, धमन्या (सा.क्र.६) याने सरतपासात असे कथन केले आहे कि, शंकर याचा खत फिर्यादीने उचलून ठेवला होता. यावरून असे दिसून येते कि, फिर्यादी व धमन्या(सा.क्र.६) हे एकमेकांच्या साक्षीशी विसंगत अशी साक्ष देत आहे.

२५. अभियोगपक्षाचे साक्षीदार व्हीला (सा.क्र. ४) हि फिर्यादीची पत्नी आहे. तिने तिच्या सरतपासामध्ये मारहाण झाल्यानंतर आरडाओरड केल्यानंतर सासू सासरे आल्याबाबत काहीही कथन केले नाही. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे साक्षीदार व्हीला हिने आरडाओरड केल्याने तिचे सासू सासरे बाहेर आले व त्यांनी सदर भांडण सोडविले. परंतु, सदर साक्षीदाराने त्याबाबत सरतपासात काहीही कथन केले नाही. याउलट तिने सरतपासात असे कथन केले आहे कि, भांडण विरसिंग याने सोडविले.

२६. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे घटनेनंतर त्याला त्याचे वडील व भाऊ यांनी उपजिल्हा रूग्णालय, तळोदा येथे नेल्याचे नमूद आहे. परंतु, साक्षीदार व्हीला हिने सरतपासामध्ये फिर्यादीस विरसिंग व तिने दवाखान्यात नेल्याचे कथन केले आहे. तसेच, सदर साक्षीदाराने आरोपीने जिवे मारल्याची धमकि दिल्याचे व हाताबुक्क्यांनी मारल्याचे देखील कथन केले नाही. सदर साक्षीदाराच्या एकंदरीत साक्षीवरून असे निदर्शनास येते कि, तिने घटनेबाबत महत्त्वाच्या बाबी सरतपासात कथन केल्या नाहीत. तसेच, तिने अभियोगपक्षाच्या विसंगत अशी साक्ष दिली आहे.

२७. अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे रमेश पावरा (सा.क्र.५) यांनी घटनेनंतर फिर्यादीला दवाखान्यात नेले होते. सदर साक्षीदाराने उलटतपासात असे कथन केले

आहे कि, त्याला संध्याकाळी ०६.०० ते ०७.०० च्या दरम्यान धमन्या यांचा फोन आला होता व त्याने घटनेबाबत सांगितले होते. परंतु, अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घटना ०७.३० वाजता घडली आहे. अशा परिस्थीतीमध्ये सदर साक्षीदारास ०६.०० ते ०७.०० च्या दरम्यान फोन करून घटनेबाबत सागण्यांचा प्रश्न उध्दभवत नाही. तसेच, सदर साक्षीदाराने उलटतपासात हे मान्य केले आहे कि, त्याने साक्ष धमन्या याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाच्या तितकीशी कामाची नाही.

२८. अभियोगपक्षाचा साक्षीदार विरसिंग (सा.क्र. ७) याने सरतपासात असे कथन केले आहे कि, तो व्हीला (सा.क्र.४) हिचा आवाज ऐकूण घटनास्थळी आला. त्याने भांडण सोडविले व त्याला घटनेबाबत धमन्या याने माहिती दिली. परंतु, फिर्यादीच्या कथनाप्रमाणे भांडण हे त्याच्या आई व वडीलांनी सोडविले होते.

२९. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान फिर्यादीने घटनेच्या वेळी घातलेले शर्ट आर्टिकल अ हे जप्ती पंचनामा (नि.क्र. ३७) प्रमाणे जप्त केले होते. सदर शर्टावरती ठिक ठिकाणी रक्ताचे डाग देखील होते. परंतु, तपासी अधिकारी यांनी सदर शर्ट हे रासायनिक परिक्षणाकरीता पाठविल्याचे दिसून येत नाही. सदर शर्ट वरील रक्ताचे डाग हे कोणाचे होते हे समजण्याकरीता त्याची तपासणी तज्ञांमार्फत होणे आवश्यक होते परंतु, तपासी अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही.

३०. फिर्यादी याने उलटतपासात कथन केले आहे कि, घटना सार्वजनिक रोडवर झाली होती व तेथे बरेच लोकं जमले होते. तसेच, व्हीला (सा.क्र.४) हिने देखील कथन केले आहे कि, घटनास्थळी नेहमी गर्दी असते. विरसिंग (सा.क्र.७) याने उलटतपासात कथन केले आहे कि, घटनेच्या वेळी २० लोकं जमले होते. परंतु, तपासी अधिकारी यांनी घटनास्थळी जमलेल्या स्वतंत्र साक्षीदारांचे जबाब नोंदविले नाहीत. अथवा अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदारांना साक्षीदार म्हणून देखील तपासले

नाही. घटनेच्या वेळी लोकं जमले असताना तपासी अधिकारी यांनी त्यांचे जबाब नोंदविणे क्रमप्राप्त होते.

**३१.** अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.३५) हा दि. ०८.०३.२०२२ रोजी करण्यात आला होता. म्हणजे, घटनास्थळ पंचनामा घटनेनंतर दोन दिवसांनी करण्यात आला होता. घटनास्थळ हे फिर्यादीचे वडील धमन्या यांनी दाखविले होते. वास्वविकतः फिर्यादी हा दवाखान्यामध्ये दाखल नसल्यामुळे घटनास्थळ फिर्यादीने दाखविणे आपेक्षीत होते. परंतु, तसे का केले नाही याबाबत कोणताही खुलासा अभिलेखावरती उपलब्ध नाही.

**३२.** अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घटना दि. ०६.०३.२०२२ रोजी रात्री ०७.३० वाजता घडली होती. परंतु, सदर घटनेची फिर्याद दि. ०७.०३.२०२२ रोजी रात्री ०७.३२ वाजता दिल्याचे दिसून येते. म्हणजेच, फिर्याद जवळपास चोवीस तास उशिराने दिल्याचे दिसते. फिर्याद उशिराने का देण्यात आली याबाबतचे कोणतेही योग्य कारण फिर्यादीमध्ये अथवा साक्षीदारांच्या साक्षीमध्ये नमूद नाही. विलंब जास्त असल्यामुळे तो अभियोगपक्षाच्या कथनास मारक ठरतो.

**३३.** अभिलेखावरील पुर्ण पुराव्याचा विचार केला असता हे स्पष्ट होते की, अभियोगपक्षाने तपासलेल्या नऊ साक्षीदारांपैकि साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोगपक्षास समर्थन दर्शविले नाही. साक्षीदार क्र. ९ तपासी अधिकारी तर, साक्षीदार क्र. ८ हे वैदयकिय अधिकारी आहेत. साक्षीदार क्र. ३ हा स्वतः फिर्यादी असून साक्षीदार क्र. ४ हि त्याची पत्नी आहे. सा.क्र. ५ हा फिर्यादीचा चुलत भाऊ आहे. तर, साक्षीदार क्र. ६ हे फिर्यादीचे वडील आहेत. तर, सा.क्र. ७ हा फिर्यादीचा नातेवाईक आहे. अभिलेखावरती अभियोगपक्षाला बळकटी देण्याकरीता फक्त साक्षीदार क्र.०३ ते ०७ यांची साक्ष उपलब्ध आहे. सदर साक्षीदारांनी मोघम आणि विसंगत अशी साक्ष दिली आहे. तसेच त्यांच्या साक्षीमध्ये तफावत आढळून येते. अभियोगपक्षाने कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. तसेच, उपलब्ध साक्षी पुरावे हे आरोपीविरूध्द

लावलेले दोषारोप संशया पलीकडे सिध्द करण्यास पुरेसे नाहीत. त्यामुळे मी या निष्कर्षास पोहचलो आहे की, अभियोग पक्ष विनासंशयीतरित्या आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणुन आरोपी हा अभिकथीत गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुददा क्र. १ ते ४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**मुददा क्र. ५ साठी –**

**३४.** प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजे पी. आर. नं. १०/२०२२ मधील एक लाकडी काठी आणि एक फिकट आकाशी रंगाचा शर्ट हे मुल्यहिन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावेत. सबब, मी मुददा क्र. ५ च्या निष्कर्षाप्रती खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **शंकर धर्मा तडवी** याला भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये असलेल्या गुन्हयाच्या आरोपातुन भारतीय न्यास सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम २७१ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | जप्त मुददेमाल म्हणजे पी. आर. नंबर १०/२०२२ मधील एक लाकडी काठी आणि एक फिकट आकाशी रंगाचा शर्ट हे मुल्यहिन असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावेत. |
| ४. | आरोपीने भारतीय न्यास सुरक्षा संहिता कलम ४८१ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– स्वतःचे बंधपत्रक व तेवढयाच रक्कमेचे जामीनदाराचे बंधपत्र सहा महिने कालावधीकरीता सादर करावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला). |

MANE DINESH DAGADU
Digitally signed by MANE DINESH DAGADU
Date: 2026.07.03 15:26:45 +0530

दिनांक– ०३.०७.२०२६ **( डी.डी. माने )**

तळोदा . न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तळोदा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer : Sneha D. Jain (Stenographer)

Court Name : Jt. CJJD, Taloda

Date : 03.07.2026

Judgment signed by the

Presiding Officer on : 03.07.2026

Judgment uploaded on : 03.07.2026

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS